प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली


# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)


(०२३५८) २८२३८७



अंक ३०/२०१७ | दिनांक १३/०४/२०१७ | कालावधी ५ दिवस



| डॉ. उत्तम महाडकर, | डॉ. ज्ञानेश्वर जगताप, | प्रा. विरेश चव्हाण, |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी, |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२२७९१९९८ | ९४०३९८८१४३ | ९४२२०६५३४४ |


**मागील हवामान सारांश**
**दि. ०९/०४/२०१७ ते १३/०४/२०१७**

| | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | |
| पाऊस (मिमी) १/१/१६ पासून | : | |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | |
| कमाल तापमान (अं.से) | : | |
| किमान तापमान (अं.से) | : | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | |

**हवामान पूर्वानुमान (१४/०४/२०१७ सकाळी ८:३० पासून १८/०४/२०१७ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)**

| हवामानांचे घटक | : | १४/०४ | १५/०४ | १६/०४ | १७/०४ | १८/०४ |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३६ | ३५ | ३४ | ३४ | ३६ |
| किमान तापमान (अं.से) | : | २४ | २४ | २३ | २३ | २४ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ० | ० | ० | ० | ० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ४९ | ६९ | ७१ | ६६ | ५१ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ४३ | ४३ | ४७ | ४७ | ४७ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००६ | ००७ | ००७ | ००६ | ००९ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

## :हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक १४ ते १८ एप्रिल, २०१७ पर्यंत अवकाश स्वच्छ सुर्यप्रकाशित राहिल. दिनाकं १४ ते १८ एप्रिल, २०१७ पर्यंत वाऱ्याचा वेग ६ ते ९ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| चिकू | वाढीची अवस्था | • चिकूवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये (मेटालॅक्झिल ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के) या संयुक्त बुरशीनाशकाचे ०.२ टक्के (२० ग्रॅम/१० लिटर पाणी) द्रावण संपूर्ण झाडावर फवारावे.<br>• मोठया आकाराची काढणीची फळे तयार झाली असून ती काढणीच्या अवस्थेत आहेत. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर अतूल चिकू झेल्याच्या सहाय्याने काढावीत. |
| नारळ/ सुपारी | -- | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी कार्बारील पावडरचे (१० लिटर पाण्यात २० ग्रॅम) मिश्रण तयार करून फवारावे.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्यानी पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मिली ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस किंवा २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस . २० मिली पाणी नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| भाजीपाला | वाढीची अवस्था | • वांगी, मिरची, कोबी, नवलकोल इ. पिकांवर मावा, तुडतुडे, फुलकीडी यांचा प्रादुर्भाव दिसून येताच मॅलॅथिऑन (२० मिली प्रति १० लिटर पाण्यात) किंवा डायमिथोएट (१२ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात) मिसळून फवारावे.<br>• वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, फळमाशीच्या नियंत्रणासाठी आंबा बागेत विद्यापीठाने शिफारस केलेले हेक्टरी ४ या प्रमाणात रक्षक सापळे लावावेत. |
| कलिंगड लागवड | - | • कलिंगड पिकाची काढणी सुरू करावी, कलिंगडाची तयार फळे ओळखण्यासाठी फळाच्या देठाजवळील वेलतंतु सुकलेला असावा व कलिंगडाच्या जातीचा तयार होण्याचा कालावधी पुर्ण झालेला असावा, तसेच फळावर टिचकी मारली असता “दबदब” आवाज यावा.<br>• वेलवर्गीय भाजीपाला व कलिंगड पिकांच्या क्षेत्रामध्ये फळमाशीच्या नियंत्रणासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले रक्षक सापळे ४ नग प्रती हेक्टरी लावावेत. |
| दुभती जनावरे /शेळया | - | • जनावराना पाणी पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठयामधे हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी.<br>• बहुवर्शीय स्वरुपाच्या वैरणीच्या पीकांची उदा. पॅरग्रास, यशवंत, नेपीयर इ. लागवड करावी. |
| सुचना | - | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |